# दिनांक 05/08/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 27

विषय – “आजादी का अमृत महोत्सव” या विषयावर सविस्तर चर्चा करणे.

भारतीय स्वातंञ्याला 75 वर्ष पुर्ण होत असलेच्या पार्श्वभुमीवर भारतीय जनतेच्या मनात स्वातंञ्य लढयाच्या स्मृती तेवत राहव्यात व देशभक्ती विषयी जाज्वल भावना कायमस्वरूपी मनात रहावी या उद्देशाने देशात सर्वत्र “आजादी का अमृत महोत्सव” साजरा करण्यात येत आहे. या अंतर्गत शासनाने विविध उपक्रम राबविणेबाबत सुचविले आहे. यानुसार नगरपरिषद कार्यालयाच्या इमारतीवर, शहरातील पुतळे यावर विदयुत रोषणाई करणेत यावी. “आजादी का अमृत महोत्सव” च्या अनुषंगाने इतर कार्यक्रमही राबविणेत यावेत. यासाठी नगरपरिषद इमारतीवरील विदयुत रोषणाईसाठी तीन दिवसासाठी र.रू.30,000/- छत्रपती शिवाजी महाराज पुतळा यासाठी प्रति दिवस र.रू.4800/- तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा यासाठी प्रति दिवस र.रू.3500/- व यशवंतराव चव्हाण पुतळा यासाठी प्रति दिवस र.रू.3500/- व क्रांतीसिंह नाना पाटील पुतळा यासासठी प्रति दिवस र.रू.3500/- या प्रमाणे खर्च येत असून सदरचा खर्च हा मागील सन 2020-2021 प्रमाणेच आहे. तरी सदर खर्चास मान्यता देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा